PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 2, ISSUE 4

# मराठी व्रतकथा व स्त्रीवादी दृष्टिकोन

प्राचार्य डॉ. केशव फाले
श्रीमती शकुंतलाबाई धाबेकर महाविद्यालय,
कारंजा (लाड) जी. वाशीम महाराष्ट्र भारत

**प्रस्तावना :—**

**स्त्रीवादाची सुरुवात केव्हापासून झाली, हे पाहिले असता असे दिसते की, शेकडो वर्षांपासून स्त्रीचे अस्तित्व पुरुषप्रधान व्यवस्थेत नाकारल्या गेले. स्त्रीलाही पुरुषाप्रमाणे भावना, विचार स्वातंत्र्य आहे. या दृष्टीने विचार करून प्रस्थापित समाज व्यवस्थेच्या विरुद्ध सामर्थ्यानीशी स्त्रीने वागण्यास सुरुवात केली. अर्थात ही सरुवात स्त्रीमुक्तीच्या चळवळीतून झाली. असे असले तरी लोकसंस्कृतीमध्ये स्त्रियांच्या भावना, विचार, आदर यांना जपलेले दिसते. याची प्रचिती काही व्रतकथांच्या माध्यमातून येते. आजही स्त्रिया व्रतपरंपरेचे पालन करतात. किंबहुना स्त्रियांच्या जीवनात व्रतांना व व्रतकथांना एक महत्त्वाचे स्थान आहे. स्त्रीजीवनाचा अविभाज्य भाग बनलेल्या व्रतकथांमध्ये स्त्रिवादाचे पैलू आढळतात का? याचा शोध घेणे प्रस्तुत शोधनिबंधाचा उद्देश आहे.**

**स्त्रीवाद संकल्पना :—**

स्त्रीवादासंदर्भात काही आग्रहामुळे यावर टिकाही भरपूर झाली. स्त्रीवादीसाहित्य हे स्त्रियांनीच लिहिलेले असते. त्याची समीक्षाही स्त्रियाच करू शकतात असाही आग्रह होऊ लागला. परंतु पुढे हा आग्रह कमी होत जाऊन पुरुषही स्त्रियांच्या भूमिकेतून अभ्यास करू शकतो, समीक्षा करू शकतो असे मानल्या गेले. या सदंर्भात निर्मला सारडा म्हणतात, ''स्त्रीवादी समीक्षा फक्त स्त्रियांनीच करावी असा काही नियम नाही. अनेक पुरुषही स्त्रीमतवादी समीक्षा करण्यात अग्रेसर आहेत.''[१] यावरून पुरुष सुद्धा स्त्रीवादी दृष्टिकोनातून साहित्याचा अभ्यास करण्यात मागे नसल्याचे दिसते.

स्त्रीलाही जगण्याचा अधिकार आहे, स्वातंत्र आहे या दृष्टिकोनातून विचार सुरू झाला तेव्हापासून स्त्रीमतवादाला सुरुवात झाली. स्त्रीवादासंदर्भात पुष्पा भावे म्हणतात, ''स्त्री म्हणून लिहिणे व स्त्रीवादी परिदृष्टी असणे यात फरक आहे........ विषमतेवर आधारलेल्या व्यवस्थेत हरविलेले व्यक्तिपण प्राप्त करून घेणे, हा स्त्रीवाद आहे.''[२] स्त्रीचे पुरुष प्रदान संस्कृतीने नाकारलेले अस्तित्व तिला परत मिळवून देणे हा मूळ उद्देश स्त्रीवादात दिसतो. स्त्रीला स्त्री म्हणून स्वतंत्र अस्तित्व आहे. ही विचारधारा स्त्रीमतवादात केंद्रस्थानी आहे. स्त्री ही पुरुषाप्रमाणे समाजाचा एक घटक म्हणून जन्माला येते. पण समाज तिला 'बाई' बनविते. तिच्यावर आपला अधिकार गाजविते. यातून स्त्रीचे अस्तित्व नाकारले जाते, कुंठित केले जाते. पुरुषाप्रमाणेच स्त्रीचे अस्तित्व, मुलभूत समाज अधिकार, हक्क, स्वातंत्र्य मान्य करणे या विचारावर

स्त्रीमतवादाची उभारणी झालेली असल्यामुळे स्त्रीवादी दृष्टिकोन स्त्रीच्या स्वातंत्र्याला, अस्तित्वाला व अधिकाराला महत्त्व देते. स्त्रीवादाचा अर्थ स्पष्ट करताना डॉ. विद्या व्यवहारे म्हणतात, ''स्त्रीवाद म्हणजे पुरुषापासून फारकत घेऊन स्त्रीने आपला स्वत:चा स्वतंत्र सुभा निर्माण करणे नव्हे, तर स्वत:च्या सामर्थ्याचा शोध घेऊन, स्वत:ला ओळखून, आपल्या विकासासाठी, पुरुषांच्या बरोबरीने संधी मिळविण्यासाठी, त्यांच्या खाद्याला खांदा लावून जीवन जगण्यासाठी, पितृसत्ताक समाज व्यवस्थेने प्रस्थापित केलेल्या परंपरा मोडून आपल्या विकासाचा मार्ग आपणच चोखाळणे म्हणजे स्त्रीवाद किंवा स्त्रीवादी विचारसरणी होय.''[३] पुरुषाबरोबर विकासाच्या संधी शोधून विकासाचा मार्ग स्वीकारणे, त्यासाठी पुरुषप्रधान परंपरा मोडून स्त्री–पुरुष समानता स्वीकारणे म्हणजचे स्त्रीवाद होय.

**मराठी व्रतकथा व स्त्रीवादी दृष्टिकोन :–**

स्त्रीवादाची सुरुवात, स्त्रीवादासंबंधी आग्रह व स्त्रीवादाचा अर्थ लक्षात घेतल्यानंतर व्रतकथांचा स्त्रीवादी दृष्टिकोनातून अभ्यास करता येतो; कारण व्रतकथा ह्या मौखिक वाङ्मयाची परंपरा प्रामुख्याने स्त्रियांनी जतन केलेली असल्यामुळे त्यात स्त्री जीवनाचे, स्त्रीमनाचे प्रतिबिंब पडणे स्वाभाविकच आहे. व्रतकथांचा स्त्रीवादी दृष्टिकोनातून अभ्यास करताना लोकसंस्कृती व वैदिकसंस्कृतीमध्ये निर्माण झालेल्या व्रतकथा, तत्कालीन समाजव्यवस्था, या समाज व्यवस्थेमधील स्त्रियांचे स्थान यांचे अवलोकन महत्त्वाचे ठरते. लोकसंस्कृतीमध्ये स्त्रियांना सन्मानाचा दर्जा असल्यामुळे लोकसंस्कृतीमधील व्रतकथांमध्ये स्त्रियांना पूजनीय मानले, तर वैदिकसंस्कृतीच्या काळात निर्माण झालेल्या लोकसंस्कृतेतर व्रतकथांमध्ये स्त्रीला पुरुषापेक्षा कमी दर्जा दिलेला दिसतो.

स्त्री ही निसर्गत: दुबळी असते, नाजूक असते स्त्रीसंदर्भातील अशा समजुतींना लोकसंस्कृतीशी निगडित असणारी व्रते व व्रतकथा छेद देतात. पार्वती, दुर्गा, भवानी, रेणुका, आदित्यराणूबाई, लक्ष्मी यासारख्या स्त्री देवता व त्यांचा व्रतकथा स्त्रीच्या अंगी असलेल्या तेजस्वितेचे दर्शन घडवितात. स्त्रिच्या अंगी असलेल्या नैसर्गिकशक्तीची जाणीव प्राचीन आदिम लोकांना झाली होती. त्यामुळेच लोकसंस्कृतीत स्त्रीला महत्त्वपूर्ण दर्जा होता. परंतु पुरुषप्रधान असलेल्या वैदिकसंस्कृतीमध्ये मात्र स्त्रीने आपल्यापेक्षा श्रेष्ठ होऊ नये एवढेच नव्हे तर आपल्या बरोबरीने राहू नये म्हणून तिला धार्मिक आचरणात गुंतवून, तिचे अस्तित्व दडपल्या गेले असावे. लोकसंस्कृतीमधील स्त्रीचा पूजनीय दर्जा वैदिकसंस्कृतीमध्ये नाकारल्या गेला. त्याकरिता वैदिक परंपरेने पुरुषदेवता निर्माण करून त्या देवतांची पत्नी असलेल्या स्त्रीदेवतेला सेवा करताना दाखविले. विष्णू–लक्ष्मीच्या प्रतिमेत लक्ष्मी ही विष्णूचे पाय दाबताना दाखविली जाते. तेच लोकसंस्कृतीची देवता शिव व पार्वतीची प्रतीमा अर्धनारी नटेश्वराच्या रूपात आढळते. यावरून लोकसंस्कृतीमध्ये असलेला स्त्रीचा दर्जा व वैदिकसंस्कृतीमध्ये असलेला स्त्रीचा दर्जा यामधील फरक लक्षात येतो. एकीकडे पार्वती, भवानी, रेणुका, दुर्गा, लक्ष्मी या नावाने स्त्रीची पूजा बांधायची, तिचे मोठेपण सांगायचे, धर्माचरणात तिला पूजनीय स्थान द्यायचे आणि प्रत्यक्षात मात्र स्त्रीची कुचंबना करून तिचे अस्तित्व नाकारायचे अशी दुटप्पी भूमिका पुरुषप्रधान वैदिकसंस्कृतीमधून दिसते.

लोकसंस्कृतीत स्त्रीपुरुष भेद नव्हता. उलट ती स्त्रीप्रधान होती. वैदिकसंस्कृतीत पुरुषप्रधानता आली. याचे प्रतिबिंब लोकसंस्कृतेतर व्रतकथांमधूनही दिसते. आर्यांची वैदिकसंस्कृती पुरुषांचे वर्चस्व जपणारी

आहे. कारण वैदिक वाङ्मयाचा रचनाकार पुरुष आणि तोही सर्वोच्च वर्णीय आहे. म्हणूनच वैदिक वाङ्मयातून स्त्रीवर अन्याय दिसते. स्त्रीवाद, स्त्रीमतवाद हे शब्द आदिम काळात लोकांना माहित नसतानाही त्याकाळी स्त्रीच्या अस्तित्वाबद्दल पुरस्कार दिसतो. म्हणूनच लोकसंस्कृतीत स्त्रीमतवाद जोपासला गेला असे म्हणता येते.

स्त्री ही समाजाचा एक महत्त्वाचा घटक आहे. संस्कृतीच्या जडण घडणीत पुरुषाप्रमाणे स्त्रीचाही वाटा असतो. ती ज्या समाजात जीवन जगते त्या समाजाच्या जीवन जगण्याच्या पद्धतीचा परिणाम पुरुषाप्रमाणेच तिच्या जीवनावरही होतो. व्रतकथा निर्मितीच्या काळातील समाज आणि कुटुंब व्यवस्था, समाजाच्या आर्थिक धारणा, समाज मनावर असलेला दैववादाचा पगडा, यातून प्रचलित झालेल्या रूढी, प्रथा, चालीरीती, आचारविचार, नीतिकल्पना आणि त्यातून स्त्रीवर पडलेली, लादलेली, बंधने व स्त्रीला या समाज व्यवथेत दिले गेलेले स्थान इत्यादींचे वर्णन व्रतकथांमध्ये आढळते. कृषिप्रधान लोकसंस्कृतीमध्ये शेतीच्या अनुषंगाने जीवनक्रम रूढ झाला. भूमी व स्त्री यांच्या साधर्म्यामुळे स्त्रीला पूजनीय दर्जा मिळाला. त्यामुळे तिफनपूजेचे व्रत, पेरणी, कापणी, धान्याच्या पूजनाचे व्रत, अंकुराच्या पूजनाचे व्रत, भूमीशी निगडित सूर्य, जल, बीज यांच्या व्रतांमध्ये स्त्रीला पूजनीय स्थान मिळाले. स्त्रीचे पूजनीय स्थान आजही कृषिजीवनात टिकून दिसते. स्त्रीच्या दर्जाचा अभ्यास प्राचीन द्रविड संस्कृतीपासून करता येतो. या संदर्भात डॉ. विद्या व्यवहारे म्हणतात, ''प्राचीन द्रविड संस्कृती स्त्रीप्रधान असल्याने या संस्कृतीत स्त्रीला प्रतिष्ठा होती. स्त्रीची ही प्रतिष्ठा मातृदेवतेच्या उपासनेतून प्रचलित झाली. मातृदेवता म्हणजे आदिमाता स्त्रीशक्ती. आदिमाता स्त्रीला पूजनीय स्थान देण्याची द्रविडांची ही परंपरा पुढे खंडित झाली आणि स्त्रीला दुय्यम स्थान मिळाले.''[४] व्रतकथेतील स्त्री देवता म्हणजे शक्तिशाली स्त्रीची प्रतिमा होय. प्राचीनकाळी स्त्रीची सर्जनशक्ती ओळखून तिला श्रेष्ठत्व दिले, पूजनीय मानले. पण वैदिक परंपरेने हळूहळू स्त्रीला दुय्यम स्थान दिले. वैदिकसंस्कृतीमध्ये पुरुष देवतांची अधिक प्रमाणात निर्मिती होऊन पुरुषप्रधानता आली. या पुरुषप्रधानतेमुळेच लोकसंस्कृतेतर व्रतांमध्ये पुरुषदेवतांचीच व्रते अधिक प्रमाणात दिसतात.

लोकसंस्कृतीमधील व वैदिकसंस्कृतीमधील स्त्रीच्या दर्जामध्ये बराच फरक आढळतो. हा फरक लोकसंस्कृतीशी निगडित व्रतकथा व लोकसंस्कृतेतर व्रतकथा यामधून अभ्यासता येतो. लोकसंस्कृतीशी निगडित व्रतकथांमध्ये पती निवडीचे स्वातंत्र्य तत्कालीन समाजव्यवस्थेत स्त्रीला असल्याचे दिसते. सावित्रीसारखी मुलगी आपल्या पित्याला म्हणते, ''मी स्वत: देशोदेशी जाऊन माझ्या योग्यतेचा वर शोधून आणील. मला आज्ञा द्यावी.'' राजा तिला आज्ञा देतो व ती आपला पती स्वत: निवडते. (वटसावित्रीची व्रतकथा) हरितालिकेच्या व्रतकथेत पार्वतीने तपश्चर्या करून शंकराला पती म्हणून प्राप्त केल्याचे वर्णन आहे. वरील व्रतकथांवरून पुरुषाप्रमाणे स्त्रीलाही आपला जीवनसाथी निवडण्याचा अधिकार लोकसंस्कृतीशी निगडित व्रतकथांमध्ये दिसतो. खासी, गारो, नायर, मनार या आदिवासी जमातींमध्ये आजही स्त्रीयांना वर निवडीची अधिकार आहे. याबाबतीत आजच्या प्रगत समाजापेक्षा आदिवासी प्रगत ठरतात.

वटसावित्रीच्या व्रतकथेत निवडलेला पती अल्पायुषी आहे, हे कळल्यावरही सावित्री एकदा घेतलेला निर्णय बदलवित नाही. येथे तिचा मनोनिग्रह दिसतो. यमराजाच्या तावडीतून पतीचे प्राण परत आणताना तिने दाखविलेले धैर्य व चातुर्य यावरून स्त्री ही पुरुषापेक्षा कुठे कमी नाही असे दिसते.

जेष्ठागौरीच्या व्रतकथेत सवाष्ण स्त्री व कुमारिकेला असलेले महत्त्व लक्षात घेता तत्कालीन समाजव्यवस्थेत स्त्रीच्या श्रेष्ठ दर्जाची जाणीव होते. आजही स्त्रीशक्तीचे देवी रूपातील पूजन स्त्रीच्या प्राचीन आदिमकाळातील पूजनीय दर्जाची आठवण करून देते.

नवरात्रीच्या नऊ दिवसाच्या काळामध्ये प्रत्येक दिवशी एक किंवा नवमीला नऊ कुमारिकेचे पूजन करून त्यांना भोजन दिल्या जाते. महिषासूर नावाच्या दैत्याशी नऊ दिवस दुर्गादेवीने युद्ध केले व त्याला ठार मारले असा उल्लेख नवरात्रीच्या व्रतकथेत आहे. येथे देवी ही स्त्री आहे व स्त्री ही पुरुषापेक्षा शक्तीने कमी नाही हे दुर्गादेवीने महिषासूराच्या केलेल्या वधावरून आकलन होते. स्त्रीच्या अंगी शक्ती आहे असे मानून आदिशक्तीची निर्मिती झाली. या आदिशक्तीचे अनेक रूपे मानतात. या रूपांचा उल्लेख व्रतकथांमध्ये आढळतो. आशापुरा मातेच्या व्रतकथेत आदिशक्तीचेच एक रूप आशापूरा माता असल्याचा उल्लेख आहे. अन्नपूर्णादेवीच्या व्रतकथेत स्त्री रूपातील अन्नपूर्णादेवीचे वर्णन आहे. यावरून स्त्रीला शक्तीशाली मानून आदिशक्तीची, तिच्या विविध रूपांची निर्मिती झाली, तिला पूजनीय स्थान मिळाले.

लोकसंस्कृतीमध्ये स्त्रीला पूजनीय व महत्त्वाचा सामाजिक दर्जा प्राप्त झाला. परंतु पुढे वैदिक धर्माच्या प्रसारामध्ये नवीन पुरुष देवता निर्माण झाल्या, पुरुषप्रधानता आली. यामुळे स्त्रीचा दर्जा खालावल्या गेला. पूजनीय असणारी, शक्तिशाली मानल्या गेलेली स्त्री पुरुषाच्या वासनेपुढे बळी पडली. अशोक व्रतकथेत रावणाने सीतेचे हरण करून तिला अशोक वृक्षाखाली नजरबंदित ठेवले. येथे स्त्रीचे शक्तिहीन, पुरुषावर निर्भर असणारे रूप दाखविले. गुरूपौर्णिमेच्या व्रतकथेत सत्यवतीच्या सुंदरतेमुळे पाराशरसारख्या ऋषींची कामवासना जागृत होते व तो सत्यवतीसमोर वासना व्यक्त करतो. तिच्याशी संबंध ठेवतो. या व्रतकथेत स्त्री ही भोगाची वस्तू मानलेली दिसते. सुंदर एकटी मुलगी पाहून पाराशरांची कामवासना जागृत होणे, तिचा उपभोग घेणे, यामधून स्त्री ही पुरुषांच्या वासना क्षमविण्यासाठी निर्माण झाली असे वर्णन दिसते. येथे वैदिक संस्कृतीत स्त्रीच्या सामाजिक दर्जात झालेले परिवर्तन दृष्टीस पडते. शुभ्र बुधवारच्या व्रतकथेत चंद्र गुरूपत्नी तारेच्या सौदर्याने प्रभावित होऊन तिला पळवून नेतो. तारेला गुरुबृहस्पतीला देण्यास तो नकार देतो. शेवटी ब्रह्मदेवाच्या मध्यस्थीने चंद्र तारेला बृहस्पतीच्या स्वाधीन करतो. तारा बृहस्पतीकडे येते तेव्हा चंद्रापासून चार महिन्याची गर्भवती असते. येथे गुरूपत्नीला पळवून नेऊन तिच्याशी संबंध ठेवल्याचे वर्णन आहे. यावरून वैदिकसंस्कृतीत स्त्री भोगग्रस्त झाल्याचे उघड होते.

लोकसंस्कृतीमध्ये स्त्रियांना महत्त्वाचा दर्जा दिसतो. भूमी आणि स्त्री यांच्यातील नवनिर्मितीच्या साधर्म्यामुळे स्त्रीबद्दल आदिमांच्या मनात भीतियुक्त आदराची भावना होती. कृषीच्या शोधानंतर नवनिर्मितीच्या साधर्म्यामुळे स्त्रीला कृषीच्या कार्यात महत्त्व प्राप्त झाले. स्त्रीला शक्तीशाली मानून आदिशक्तीची उपासना करण्याची पद्धत रूढ झाली. पुढे या आदिशक्तीची अनेक रूपे मानली गेली. आर्यांच्या आगनानंतर वैदिक धर्माची स्थापना होऊन अनेक वैदिक धर्मग्रंथ, देवता निर्माण झाल्या. आर्यांच्या वैदिकसंस्कृतीमध्ये सर्वात मोठा परिणाम स्त्री वर्गावर झाला. पुरुषसत्ताक संस्कृती उदयाला येऊन स्त्रियांचा जगण्याचा हक्कच या वैदिकसंस्कृतीने हिरावून घेतला. आदिमांच्या लोकसंस्कृतीमध्ये पूजल्या जाणारी स्त्री आर्यांच्या वैदिकसंस्कृतीमध्ये चूल आणि मूल एवढ्या पर्यंतच मर्यादित होऊन भोगग्रस्त झाली. लोकसंस्कृतेतर व्रतकथांमध्ये स्त्री दुय्यम, दासी, हीन, भोगग्रस्त असल्याचे चित्रण आले आहे. येथे

स्त्रीमतवादास मूठमाती दिल्या गेली. स्त्रियांना अधोगतीस नेण्याचे कार्य वैदिक धर्मग्रंथातून झाले. रामायणातील सीता, महाभारतातील कुंती, द्रौपदी हे याचेच उदाहरणे आहेत.

**निष्कर्ष :–**

व्रतकथांचे लोकसंस्कृतीशी निगडित व्रतकथा व लोकसंस्कृतेतर व्रतकथा असे विभाजन करता येते. या व्रतकथांचे स्त्रीवादी दृष्टिकोनातून अध्ययन केले असता असे अवलोकनास येते की, लोकसंस्कृतीशी निगडित व्रतकथांमध्ये आज अभिप्रेत असलेला स्त्रीवाद लोकसंस्कृतीत जतन केल्या जात होता. तेव्हा स्त्रीला अग्रस्थान होते. मान होता. लोकसंस्कृतेतर व्रतकथांमध्ये ती दुय्यम स्थानी असलेली दिसते. स्त्रीमतवाद लोकसंस्कृतीमध्ये जपलेला दिसतो. लोकसंस्कृतीची पुनर्स्थापना झाली तर स्त्री खऱ्या अर्थाने मुक्त होईल. खरी स्त्रीपुरुष समानता प्रस्थापित होईल.

## संदर्भ

१) सारडा निर्मला, 'स्त्रीमतवादी समीक्षा', हा लेख, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, पुणे, संपा. शंकर सारडा, ऑगष्ट १९९१, पृ.६४.

२) भावे पुष्पा, 'एकविसाव्या शतकातील आव्हाने आणि मराठीतील नवे वाङ्मयीन प्रवाह', या विषयावरील परिसंवाद, अ.भा. मराठी साहित्य संमेलन, पुणे, दै. लोकमत नागपूर, दि. २१ जाने. २००२, पृ.१०.

३) डॉ. व्यवहारे विद्या, 'लोकसाहित्य लोकसंस्कृती', प्रतिमा प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, २० जून २००२, पृ.१२४.

४) डॉ. व्यवहारे विद्या, तत्रैव., पृ.७७.